**नि.फौ.ख.क्र. १६१/२०२०**
**सरकार वि. धर्मराज**
**नि.क्र.२९**

साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–राकेश वसंतराव फटिंग
वय २९ वर्ष, व्यवसाय–शेती.
राह.सिर्सी तह.उमरेड, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

**१.** पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी दि.३१/०८/२०२० रोजी समन्स पत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीती नाही. सहीला **निशानी क्र.३०** देण्यात आला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता सहीपुरता **निशानी क्र.३१** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला **आर्टीकल अ** देण्यात आले. आरोपीच्या गैरहजेरीचा अर्ज **नि.क्र.२८** वर मंजुर. ओळखीबाबत तक्रार नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.३१/०८/२०२० रोजी पंचनामा करणेकामी हजर राहण्यासाठी समन्स पत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा केला होता तसेच त्यातील मजकुर मला वाचुन दाखविला व माझे फोटो काढले तसेच माझ्यासमक्ष चतुर्सिमा नोंदविल्या होत्या व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी बरोबर लिहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**
**आरोपीतर्फे ॲड.आर.बी.भोबे यांनी उलटतपास नाकारला.**
**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि १२.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड